# राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या अग्निपंख व माझी जीवनयात्रा या पुस्तकावर लेखी परीक्षेचे आयोजन

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पुढाकारातून वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम पंधरवाडा दि. ०१ ते १५ जानेवारी या कालावधीत राबविण्यात आला या उपक्रमा अंतर्गत कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आर्वी ग्रंथालया तर्फे स्व.दिलीपराव उपाख्य भैयासाहेब काळे यांचे स्मृती प्रित्यर्थ 'वाचते व्हा' या उपक्रमा अंतर्गत दि. ०४/०१/२०२५ रोजी वाचन चळवळीचा उद्घाटन सोहळा व लेखी परीक्षा सन २०२४-२५ चे वाचनीय साहित्यिक माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या अग्निपंख व माझी जीवनयात्रा या पुस्तकावर आयोजित करण्यात आली होती.

या उपक्रमाच्या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष भारत शिक्षण संस्था व कृषक शिक्षण संस्था आर्वीच्या अध्यक्ष ॲड. शोभाताई काळे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ.अरविंद देशमुख उपस्थित होते. सोबतच आर्वी विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री.सुमितजी वानखेडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्री.संदीपजी काळे, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रविंद्र सोनटक्के उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक डॉ.अरविंद देशमुख यांनी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्र बद्दल माहिती सांगून, अग्निपंख या पुस्तकातील दाखले डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जीवनप्रवास उलगडण्याचा प्रयत्न केला. भारत शिक्षण संस्था व कृषक शिक्षण संस्था आर्वीच्या अध्यक्ष ॲड.शोभाताई काळे यांनी ॲड.स्व.भैयासाहेब काळे यांच्या व्यासंगी वाचनाबद्दल विवेचन करून त्यांच्या पुस्तकाच्या आवडीबद्द्ल सांगितले. विविध विषयांचे पुस्तके वाचून त्यावर चर्चा करायला ॲड.स्व.भैयासाहेबांना आवडत होते. सोबतच आजच्या विद्यार्थ्यांना त्यातून कशाप्रकारे प्रेरणा घ्यायला पाहिजे हे सांगितले.आर्वीचे आमदार श्री सुमितजी वानखेडे यांनी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेऊन देशहितासाठी कार्य करायला पाहिजे असे सांगितले.

कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,आर्वी व कृषक कन्या विद्यालय, आर्वी या परिक्षा केंद्रावर १९५० विद्यार्थी, तर मॉडेल हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय, कारंजा(घा) येथे ५५० विद्यार्थी व मॉडेल हायस्कूल, सालोड (हिरापूर) येथे १८ विद्यार्थी असे २५१८ विध्यार्थी परीक्षेसाठी हजर होते. परीक्षेकरिता त्या शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेतर्फे डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलामांचे अग्निपंख व माझी जीवनयात्रा हे पुस्तक उपलब्ध करून देण्यात आले होते. त्यातून विद्यार्थ्यांचे ज्ञानवृद्धींगत व्हावे व विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी हा उद्देश या उपक्रमा चा आहे

संचालन डॉ.भावना माळोदे यांनी, प्रास्ताविक प्राचार्य डॉ.रविंद्र सोनटक्के यांनी तर आभार डॉ.मनीषा खाकरे यांनी मानले.याप्रसंगी संस्थेअतंर्गत येणाऱ्या सर्व शाळा, महाविद्यालयांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक, शिक्षिका व मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते.

या परीक्षेच्या निमिताने का होईना आम्ही अग्निपंख व माझी जीवनयात्रा ही पुस्तक वाचली, त्यामुळे आम्हाला वाचनाची आवड लागली. अशा प्रकारच्या परीक्षा दरवर्षी झाल्यास आमचे वाचन वाढेल अशा बोलक्या प्रतिक्रिया यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी दिल्या.




वाचन चळवळीचा उद्घाटन सोहळा
'वाचते व्हा'
व
लेखी परीक्षा
साहित्यिक-डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम


व
लेखी परीक्षा
सन २०२४-२५ चे वाचनीय
साहित्यिक-डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम
कृषक कन्या विद्यालय, आर्वी, जि. वर्धा
माणसांना अडचणी येणं





Krushak Education Society, Arvi

# ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, ARVI

**DIST. WARDHA**

## Department Of Library

स्व.दिलीपराव उपाख्य भैयासाहेब काळे स्मृति मंच,आर्वी द्वारा
'वाचते व्हा' कार्यक्रमातील क्षणचित्रे व वर्तमानपत्रातील बातम्या.








लोकमत

२ हजार ५१८ विद्यार्थ्यांनी दिलीय परीक्षा

'वाचते व्हा' उपक्रम : पाच केंद्रावर परीक्षार्थ्यांची गजबज


तरुण भारत

२५१८ विद्यार्थ्यांनी एकाच वेळी दिली परीक्षा


देशोन्नती

तालुका अपडेट

स्व भैय्यासाहेब उपाध्य दिलीपराव काळे स्मृती मंच दारा परीक्षेचे आयोजन








पुण्यनगरी

२५१८ विद्यार्थ्यांनी एका वेळेस दिली परीक्षा

# 'अग्निपंख व मेरी जीवन यात्रा' पुस्तक पर परीक्षा

## 2518 विद्यार्थी हुए शामिल

■ आर्वी (त. सं). शहर के भारत शिक्षण संस्था व कृषक शिक्षण संस्था आर्वी द्वारा दिवंगत दिलीप उपाध्य भैयासाहब काले स्मृति मंच द्वारा 'पढ़ते रहो' इस उपक्रम अंतर्गत वाचन आंदोलन का उद्घाटन समारोह व लिखित परीक्षा आयोजित की थी. यह परीक्षा वर्ष 2024-25 के वाचनीय साहित्यिक पूर्व राष्ट्रपति डॉ. एपीजे अब्दुल कलाम के अग्निपंख व मेरी जीवन यात्रा पुस्तक पर आयोजित थी. इसका उद्घाटन भारत शिक्षण संस्था अध्यक्ष, कृषक शिक्षण संस्था अध्यक्षा एड. शोभा




काले ने किया. प्रमुख मार्गदर्शक संत साहित्य के डॉ. अरविंद देशमुख, विधायक सुमित वानखडे, कृषि उपज बाजार समिति सभापति संदीप काले, प्राचार्य डॉ. रविंद्र सोनटक्के उपस्थित थे. प्रमुख मार्गदर्शक डॉ. अरविंद देशमुख ने डॉ. अब्दुल कलाम के जीवनी की जानकारी दी. एड. शोभा काले ने दिवंगत काले के वाचन व पुस्तक वाचन की आदत के बारे में बताया. इसमें कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व कृषक कन्या विद्यालय के परीक्षा केंद्र पर 1950 छात्र, मॉडल हाईस्कूल कनिष्ठ महाविद्यालय कारंजा में 550 छात्र, सालोड हिरापुर के मॉडल हाईस्कूल में 18 छात्र ऐसे कुल मिलाकर 2518 छात्र परीक्षा में उपस्थित हुए थे. परीक्षा के लिए छात्रों को डॉ. कलाम का अग्निपंख व मेरी जीवनयात्रा पुस्तक उपलब्ध कराया. उपक्रम का उद्देश्य इससे छात्रों का ज्ञान और छात्र की वाचन में रुचि बढ़ाना है. संचालन डॉ. भावना मालोदे व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. रविंद्र सोनटक्के ने किया. आभार डॉ. मनीषा खाकरे ने माना. इस प्रसंग पर प्रधानाचार्य, प्राचार्य, शिक्षक छात्र उपस्थित थे.

Wardha Plus Edition

देशोन्नती
तालुका अपडेट

# स्व भैय्यासाहेब उपाध्य दिलीपराव काळे स्मृती मंच द्वारा परीक्षेचे आयोजन

## एकाच वेळी दिली २५१८ विद्यार्थ्यांनी परीक्षा

देशोन्नती वृत्तसंकलन

आर्वी :- भारत शिक्षण संस्था व कृषक शिक्षण संस्था,आर्वी, द्वारा प्रेरित स्व.दिलीपराव उपाध्य भैय्यासाहेब काळे स्मृति मंच,आर्वी द्वारा 'वाचते व्हा' या उपक्रमा अंतर्गत वाचन चळवळीचा उद्घाटन सोहळा व लेखी परीक्षा सन २०२४-२५ चे वाचनीय साहित्यिक माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या अग्निपंख व माझी जीवनयात्रा या पुस्तकावर आयोजित करण्यात आली होती.

या उपक्रमाच्या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष भारत शिक्षण संस्था व कृषक शिक्षण संस्था आर्वीच्या अध्यक्षा ॲड. शोभाताई काळे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ.अरविंद देशमुख उपस्थित होते. सोबतच आर्वी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुमितजी वानखेडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संदीप काळे, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविंद्र सोनटक्के उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक डॉ.अरविंद देशमुख यांनी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्र बद्दल माहिती सांगून, अग्निपंख या पुस्तकातील दाखले, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जीवनप्रवास उलगडण्याचा प्रयत्न केला. भारत शिक्षण संस्था व कृषक शिक्षण संस्था आर्वीच्या अध्यक्षा ॲड.शोभाताई काळे यांनी



ॲड.स्व.भैय्यासाहेब काळे यांच्या वाचनाबद्दल विवेचन करून त्यांच्या पुस्तकांच्या आवडीबद्दल सांगितले. विविध विषयाचे पुस्तके वाचून त्यावर चर्चा करायला ॲड.स्व.भैय्यासाहेबांना आवडत होते. सोबतच आजच्या विद्यार्थ्यांना त्यातून कशाप्रकारे प्रेरणा घ्यायला पाहिजे हे सांगितले. आर्वीचे आमदार सुमित वानखेडे यांनी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेऊन देशहितासाठी कार्य करायला पाहिजे असे सांगितले.

कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,आर्वी व कृषक कन्या विद्यालय, आर्वी या परिक्षा केंद्रावर १९५० विद्यार्थी, तर मॉडेल हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय, कारंजा(घा) येथे ५५० विद्यार्थी व मॉडेल हायस्कूल, सालोड (हिरापूर) येथे १८ विद्यार्थी असे २५१८ विद्यार्थी परीक्षेसाठी हजर होते. परीक्षेकरिता त्या शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेतर्फे डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलामांचे अग्निपंख व माझी जीवनयात्रा हे पुस्तक उपलब्ध करून देण्यात आले होते. त्यातून विद्यार्थ्यांचे ज्ञानवृद्धींगत व्हावे व विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी हा उद्देश या उपक्रमा चा आहे.

संचालन डॉ.भावना मालोदे यांनी, प्रास्ताविक प्राचार्य डॉ.रविंद्र सोनटक्के यांनी तर आभार डॉ.मनीषा खाकरे यांनी मानले. याप्रसंगी संस्थेअंतर्गत येणाऱ्या सर्व शाळा, महाविद्यालयाचे मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक, शिक्षिका व मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते.

या परीक्षेच्या निमित्ताने का होईना आम्ही अग्निपंख व माझी जीवनयात्रा ही पुस्तक वाचली, त्यामुळे आम्हाला वाचनाची आवड लागली. अशा प्रकारच्या परीक्षा दरवर्षी झाल्यास आमचे वाचन वाढेल अशा बोलक्या प्रतिक्रिया यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी दिल्या.
तालुका प्रतिनिधी